## पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक ०७.०३.२०१७<br>०१.०० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :–औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यावद्रे आपणास सुचित करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक ०७.०३.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे वैजापुरः–** गुरन I १०७/१७ कलम ४५४ ४५७ ३८० भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे रामदास अंबादास नरोडे वय ४० वर्ष व्यवसाय मालवाहतुक रा. करंजगाव ता. वैजापुर यांनी फिर्याद दिली की दिनांक ०१.०३.२०१७ रोजी ०८.०० ते दिनांक ०६.०३.२०१७ रोजी ०९.००वा. पावेतो दरम्यान यातील फिर्यादीचे मौजे करंजगाव येथील राहते घराचे कुलुप तोडुन त्याचे घरात प्रवेश करून रोख ५००००/–रू. व २२०००/–रू. किं. सोन्याचे दागीने असा एकुण ७२०००/–रू. किं. चा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने लबाडीचे इरादयाने चोरून नेला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सफौ कटकुरी पोस्टे वैजापुर हे करीत आहे.

**आकस्मात मृत्युः–**

**०१) पोस्टे वैजापुरः–** आ.मृ. नंबर २०/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार वैद्यकीय अधिकारी उपजिल्हा रूग्णालय वैजापुर यांनी खबर दिली की यातील मयत नामे राहुल किसन नवले वय १८ वर्ष रा. किरीतपुर ता. वैजापुर हा घराजवळील विहीरीमध्ये पडुन मयत झाल्याने त्यास मृत अवस्थेत उपजिल्हा रूग्णालय वैजापुर येथे दाखल केले वगैरे एमएलसी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/८७२ वेलगुडे पोस्टे वैजापुर हे करीत आहे.

**मुंबई जुगार कायदाः—**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात पोस्टे गंगापुर ला ०१ गुन्हा मुंबई जुगार कायदया प्रमाणे ०४ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ३९१०/—रू. नगदी व जुगाराचे साहीत्य असा एकुण माल जप्त करण्यात आला आहे.

स्वाक्षरीत
पोलीस अधिक्षक
औरंगाबाद ग्रामीण करीता

**श्री सफौ जाधव नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण**